दिनांक ०४/०७/२०२०

# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक प्रदीप हिरालाल धोटे, पोलीस हवालदार, नेमणुक- सहायक पोलीस आयुक्त कार्यालय, छावणी विभाग, औरंगाबाद शहर यांनी २०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक प्रदीप हिरालाल धोटे, पोलीस हवालदार, नेमणुक- सहायक पोलीस आयुक्त कार्यालय, छावणी विभाग, औरंगाबाद शहर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | कु. शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | २०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे नातेवाईका विरुद्ध दाखल गुन्ह्यात सीआरपीसी कलम १०७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाईचा प्रस्ताव फाईल करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | सहायक पोलीस आयुक्त कार्यालय, छावणी विभाग, औरंगाबाद शहर |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे नातेवाईका विरुद्ध दाखल गुन्ह्यात सीआरपीसी कलम १०७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाईचा प्रस्ताव फाईल करण्यासाठी आरोपी लोकसेवक प्रदीप धोटे, नेमणुक- सहायक पोलीस आयुक्त कार्यालय, छावणी विभाग, औरंगाबाद शहर हे ४०००/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, पोलीस हवालदार धोटे यांनी तक्रारदार यांच्याकडे २०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक ०४/०७/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी लोकसेवक प्रदीप हिरालाल धोटे, पोलीस हवालदार यांनी तक्रारदार यांच्याकडुन २०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. श्री. अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कु. शुभांगी सुर्यवंशी यांनी केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, संदीप आव्हाळे, पोशि किशोर म्हस्के, राजेंद्र सिनकर व चापोशि चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

उप अधीक्षक कार्यालय ... करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**

